महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र.कोविमं/१२वी-परीक्षा/खाजगी/ १२८०
दिनांक : १३/०८/२०१८

प्रति,

मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक)
जिल्हा परिषद,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय : महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या संपर्क केंद्राचे मागणीसाठीचे अर्जाबाबत...**

**संदर्भ :-१) क्र.रा.मं./संशोधन/४२५६/पुणे दिनांक:०७ /०८/२०१८**
**२) क्र.रा.मं./संशोधन/४३००/पुणे दिनांक:१३ /०८/२०१८**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाचे कामकाज महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या अखत्यारित असल्याने मुक्त विद्यालय मंडळासाठी संपर्क केंद्राचे निश्चितकरण करण्यासाठी महाराष्ट्र राँज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वेबसाईटवर मुक्त विद्यालय मंडळ संपर्क केंद्र मागणी अर्जाची लिंक अपलोड केलेली आहे.

सदर लिंकद्वारे मुक्त विद्यालय मंडळासाठी संपर्क केंद्रासाठी ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज करण्याची मुदत दिनांक १०/०८/२०१८ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भिय क्रं.२ च्या पत्रान्वये अर्ज करण्यास आता **दिनांक २०/०८/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे**. तरी आपल्या जिल्हयातील प्रत्येक गटातून तालुकास्तरावर किमान एक किंवा विद्यार्थी संख्येनुसार केंद्र मागणी अर्ज भरणेबाबत सूचना देण्यात येऊन त्याचा पाठपुरावा करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कोल्हापूर विभागीय मंडळास सादर करावा.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ.कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सादर व पुढील कार्यवाहीसाठी....
१) मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्चमाध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
२) प्राचार्य/मुख्याध्यापक,सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा / सांगली / कोल्हापूर.

Acer/msword/letter

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.
## संपर्क केंद्र

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकः ममुवि२०१६/प्र.क्र.८/एसडी-२, दि. १४ जुलै २०१७ नुसार महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ स्थापना करण्याबाबत कार्यवाही झाली आहे. औपचारिक शिक्षणाला पूरक समांतर शिक्षण पध्दतीमध्ये मुक्त विद्यालयात संपर्क केंद्र अत्यंत महत्त्वाचे आहे. इयत्ता ५ वी, ८ वी, १० वी व १२ वी या परीक्षा प्रचलित परीक्षेशी समकक्ष असणार आहेत. त्यांची अंमलबजावणी व लाभ औपचारिक शिक्षण प्रक्रियेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी होणार आहे. हा लाभ परिणामकारक होण्यासाठी मुक्त विद्यालय मंडळातील संपर्क केंद्राची भूमिका महत्त्वाची असणार आहे. या संपर्क केंद्रांमधून विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळावे, त्यांच्या शंका/अडचणी स्थानिक पातळीवर निवारण व्हाव्यात यादृष्टीने ही संपर्क केंद्रे सहाय्यभूत ठरतील. केंद्र निर्मिती, संचलन व त्याची फलनिष्पत्ती पुढील प्रमाणे असणार आहे.

१) संपर्क केंद्र निर्मिती –

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती व इतर गोष्टींचा विचार करता खालीलप्रमाणे संपर्क केंद्र निर्माण करावयाची आहेत.

अ) ग्रामीण भाग (नगरपालिकेसह)– प्रत्येक तालुकास्तरावर

१) प्राथमिक व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी व ८ वी) – १ केंद्र
(इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत वर्ग असलेली शाळा)

२) माध्यमिक स्तर (इयत्ता १० वी)
३) उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता १२ वी)
(इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत वर्ग असलेली शाळा) } १ केंद्र

ब) शहरी भाग (महानगरपालिका क्षेत्रे)

१) प्राथमिक व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी व ८ वी) – २ केंद्र
(SSA-URC प्रमाणे व विद्यार्थी संख्येनुसार)
(इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत वर्ग असलेल्या शाळा)

२) माध्यमिक स्तर (१० वी) उच्च माध्यमिक स्तर (१२ वी) – URC प्रमाणे
(इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत वर्ग असलेली शाळा)

* इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत मान्यता असणाऱ्या शाळांना/संस्थांना संपर्क केंद्र निर्मितीसाठी प्राधान्य राहील.
* आवश्यकतेनुसार संपर्क केंद्र संख्येत वाढ किंवा घट करण्याचा अधिकार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ यांना राहील.

**संपर्क केंद्र स्थापनेचे निकष –(५ वी, ८ वी, १० वी, १२ वी)**

१) या विद्यालयास महाराष्ट्र शासनाची मान्यता आवश्यक आहे तसेच प्रत्येक विषयासही शासन मान्यता आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा सांकेतांक क्रमांक असणे आवश्यक आहे. (इयत्ता १० वी व १२ वी च्या संपर्क केंद्रासाठी)

२) कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखांची मान्यता असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयातच इयत्ता १२ वी चे संपर्क केंद्र सुरू करता येईल.

३) विज्ञान शाखेकरिता रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, भूगोल, संगणक (IT) या विषयांच्या स्वतंत्र प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे.

४) इमारत व इतर भौतिक सुविधा प्रचलित निकषानुसार असाव्यात.

५) संपर्क केंद्राचे भौगोलिक स्थान मध्यवर्ती असावे.

६) संपर्क केंद्रावर किमान ५० विद्यार्थ्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे. १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यास दुसरे नवीन संपर्क केंद्र निर्माण केले जाईल.

७) LCD Projector, E-learning ची सुविधा उपलब्ध असावी.

८) NSQF विषय मान्यता असणाऱ्या शाळांना प्राधान्य दिले जाईल.

वरीलप्रमाणे संपर्क केंद्र स्थापन/निर्मिती करताना शैक्षणिक संस्थाकडून आलेल्या प्रस्तावानुसार विभागीय मंडळ आवश्यकतेनुसार पथके तयार करतील त्यामध्ये क्षेत्रीय अधिकारी (जिल्हा शिक्षणाधिकारी) व अन्य घटकांचा समावेश असलेल्या पथकाकडून तपासणी (Spot Verification) करून आलेल्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ या संपर्क केंद्रांना रितसर मान्यता देतील व तद्नंतरच संपर्क केंद्र कार्यान्वीत होतील. विभागीय मंडळाचा अधिकारी तपासणी पथकाचा प्रमुख राहील.

२) **संपर्क केंद्र संचलन –**

संपर्क केंद्रास मान्यता मिळाल्यानंतर या केंद्राचे संचलन करण्यासाठी पुढीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

१) केंद्र समन्वयक – ०१

२) सहायक केंद्रसमन्वयक – ०१

केंद्रसमन्वयक हे या संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य असतील. त्यांना या केंद्राचे केंद्र समन्वयक म्हणून काम पहाणे अनिवार्य राहील. (केंद्र समन्वयक यांनी त्यांच्या अधिनस्थ आस्थापनेवरील शिक्षकांपैकी एका शिक्षकास सहायक केंद्र समन्वयक म्हणून जबाबदारी देणेत यावी)

**या संपर्क केंद्राचे संचलन खालीलप्रमाणे राहील.**

१) संपर्क केंद्रावर प्रवेश घेणारे विद्यार्थी हे परीक्षेपूर्वी अगोदरचे तीन महिने शनिवार व रविवार वेळापत्रकानुसार अभ्यास केंद्रावर उपस्थित राहतील. वेळापत्रक मुक्त विद्यालयाकडून निश्चित करून दिले जाईल.

२) संपर्क केंद्रावर विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा फॉर्म भरून घेणे (ऑनलाईन), हॉल तिकीट देणे, गुणपत्रक व प्रमाणपत्र देणे.

३) संपर्क केंद्रावर स्वाध्यायपुस्तिका/कृतिपुस्तिका, प्रकल्प व अंतर्गत मूल्यमापन याबाबत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ नियमाप्रमाणे पूर्ण करून घेण्याची जबाबदारी राहील.

४) संपर्क केंद्रावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना शक्यतो त्याच संपर्क केंद्रातील शिक्षक मार्गदर्शन करतील, गरज पडल्यास परिसरातील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सहाय्य घेतले जाईल.

५) संपर्क केंद्रावरील विद्यार्थ्यांना अध्ययन साहित्य व इतर साहित्य देण्याची व्यवस्था मंडळामार्फत करण्यात येईल.

वरील सर्व कामे केंद्रसमन्वयक यांनी आपल्या सहायक केंद्रसमन्वयक तसेच शिक्षकांच्या मदतीने पूर्ण करून घ्यावयाची आहेत.

## महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.
### संपर्क केंद्रासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

(१) संस्थेचे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक
(शाळेचा UDISE )
शाळेचा इंडेक्स नंबर - (इयत्ता १० वी)
(२) संस्था अध्यक्ष/सचिव, नांव, पत्ता व दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक
(३) शाळेचे नांव, पत्ता दूरध्वनी क्रमांक
(४) शाळेचा प्रकार (अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयं अर्थ सहाय्यित)
(५) शाळेतील इयत्ता
(६) शाळेचे माध्यम (मराठी/हिंदी/इंग्रजी/उर्दू)
(७) शाळेत खालील सुविधा उपलब्ध आहेत का?

i) प्रयोगशाळा - होय/नाही.
ii) संगणक कक्ष - होय/नाही.
iii) संगणक कक्षात इंटरनेट/वायफाय सुविधा उपलब्ध आहेत का? - आहे/नाही.
iv) पुरेसे क्रीडांगण
v) पिण्याच्या पाण्याची सोय
vi) मुलामुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय
vii) पुरेसे फर्निचर (बाके, कपाटे, टेबले इ.)
viii) स्टाफची माहिती -

| संच मान्यतेनुसार - | शिक्षक | शिक्षकेतर |
|---|---|---|
| मंजूर पदे | | |
| कार्यरत पदे | | |

ix) NSQF चे विषय

सही/-

मुख्याध्यापक
शाळेचा शिक्का

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.

परिपत्रक क्र. रा.मं./संशोधन/मुविमं/३९३१, दिनांक -२४/०७/२०१८

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाकरिता संपर्क केंद्र निश्चित करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर संपर्क केंद्र मागणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना खालील लिंक वर उपलब्ध आहे.

https://goo.gl/forms/av5ejQRLzGmlSPbD2

सदरची लिंक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे यांच्या खालील अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक २४/०७/२०१८ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या परिपत्रकान्वये, सर्व मुख्याध्यापकांना सूचित करण्यात येते की, राज्यमंडळाच्या उपरोक्त अधिकृत संकेतस्थळावरील https://goo.gl/forms/av5ejQRLzGmlSPbD2 या लिंक वर उपलब्ध ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती भरून दिनांक १०/०८/२०१८ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत अर्ज ऑनलाईन (Submit) सादर करावा.

सचिव,
मुक्त विद्यालय मंडळ,पुणे.